जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७५२ दिनांक - २१/१०/२०२३**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

**अमोल बाळासाहेब आडेगावकर (टोळी प्रमुख)**
**व त्याचे इतर ०५ साथीदार यांचेविरूध्द मकोका कारवाई**

यातील फिर्यादी हे दिनांक १४/०९/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा.चे सुमारास महादेवनगर मांजरी रोडवरील नविन ओव्हर ब्रिजवर मांजरी ब्रु ता.हवेली जि.पुणे येथे मोबाईल फोन पाहत एकटेच बसले होते. त्यावेळी तीन अनोळखी इसम त्यांचे जवळ आले. त्यापैकी एका इसमाने फिर्यादीस पाठीमागुन पकडले व दोघांनी त्यांचे हातातील मोबाईल फोन हिसकाऊन घेतला. त्यावेळी त्यापैकी एका इसमाने आम्ही इथले भाई आहोत. तु जर पोलीसांकडे तक्रार केली तर तुला मांजरी मध्ये राहु देणार नाही असे म्हणाला. त्यानंतर ते तिघेजण फिर्यादीचा फोन जबरदस्तीने घेवुन निघुन गेले. म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४१५/२०२३ भा.दं.वि.कलम ३९२,३९५,१२०(ब),३४, अन्वये गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचा तपास हडपसर पो.स्टे.व गुन्हे शाखा,पुणे शहर असे समांतर तपास करीत असताना, युनिट-०५ गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे बातमीरादारामार्फत मिळालेल्या बातमीवरुन सापळा लावुन पोलीस अभिलेखावरील दाखल गुन्हयातील आरोपी (१) **अमोल बाळासाहेब आडेगावकर वय ३० वर्षे रा.म्हसोबा कॉलनी, गोपाळपट्टी मांजरी बु पुणे (टोळी प्रमुख)** (२) **रोहन भगवान थोरात वय २० वर्षे रा.गोपाळपट्टी मांजरी बुा.ता.हवेली जि.पुणे** (३) **गणेश गौतम कोरडे वय २२ वर्षे रा.म्हातोबाची आळंदी,ता.हवेली जि.पुणे.**(४)**आशितोष विक्रम गजरे वय २२ वर्षे रा.स.नं.५,झेड हाईटस, कल्याणी स्कुलजवळ,रंगीचा ओढा,मांजरी पुणे** (५) **मंगेश गणेश मोरे,वय २२ वर्षे रा.स.नं.५,झेड हाईटस,कल्याणी स्कुलजवळ,रंगीचा ओढा,मांजरी पुणे (टोळी सदस्य)** यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद आरोपीं **अमोल बाळासाहेब आडेगावकर (टोळी प्रमुख)** याने संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असून,त्यांनी हडपसर,मांजरी,या भागात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढविण्यासाठी तसेच इतर साथीदारांसह मालमत्ते विरुध्दचे तसेच शरीरा विरूध्दचे गुन्हे त्यामध्ये खुन करणे, घातक शस्त्र बाळगुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,घरफोडी चोरी करणे,जबरी चोरी करणे,नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणे,येणारे-जाणारे लोकांना हत्यारे दाखवुन त्यांचेकडे पैशाची मागणी करणे,एकत्रित पणे छोटे व्यवसायिक व दुकानदार तसेच पथारीवाले यांना दमदाटी करणे,गंभीर गुन्हे वारंवार करीत असतात. त्याने व त्याचे टोळीतील सदस्यांनी हडपसर परिसरात मोठया प्रमाणात दहशत निर्माण करुन पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(**ii**),३(२),३(४) चा अंतर्भाव करण्याकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पो.स्टे.पुणे शहर,श्री.रविंद्र शेळके यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४१५/२०२३,भादंवि कलम ३९२, ३९५,१२०(ब),३४ अन्वये दाखल असलेल्या गुन्हया मध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे,श्रीमती.अश्विनी राख ह्या करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त, परीमंडळ-०५,पुणे,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्रीमती अश्विनी राख यांचे मार्गर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.रविंद्र शेळके, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विश्वास डगळे, सहा.पोलीस निरीक्षक सारीका जगताप, तसेच हडपसर निगराणी पथकातील पोलीस अंमलदार,प्रविण शिंदे,महेश उबाळे,राजश्री खैरे,वसीम शेख,गिरीश एकोर्गे,बाबा शिंदे,यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर भर देवुन शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचे उद्देशाने कठोर पावले उचलण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ७० वी कारवाई आहे.**